**एस.सी.सी.क्र.३७१/२०२२**
**सरकार वि. रोहीदास**
**नि.क्र.१४**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांचा पुरावा**.

मी याद्वारे शपथपूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – रमेश बाबुराव वाघमारे,
वय – ५२ वर्षे , व्यवसाय - शेती,
राहणार – देवटाकळी, ता. शेवगाव जि.अहमदनगर

सरतपासणी सहा. सरकारी वकील **श्रीमती पी.आर.गिते यांचेमार्फतः**–

०१. दि. ११.०२.२०२२ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्याकामी देवटाकळी येथील गट क्र.३५६ मध्ये बोलावले होते. त्याठिकाणी बाचाबाची चालु होती. त्यावेळी पोलीसांनी माझ्या समक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. त्यावेळी पोलीसांनी माझ्या समक्ष औषधाची बाटली जप्त केली. ती बाटली कशी होती हे मला आता आठवत नाही, परंतु मला दाखवल्यास मी ओळखु शकतो. आता मला ती बॉटल दाखवण्यात आली. ती तीच आहे. त्यास **आर्टीकल 'अ'** देण्यात येते.

०२. आता मला पंचनामा दाखवण्यात आला. तो तोच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१५** देण्यात येते.

उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.के.के.गलांडे यांचेमार्फतः-

०३. हे म्हणणे खरे आहे की, मला पंचनामा आठवत नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी पोलीस स्टेशन मध्ये पंचनाम्यावर माझी सही घेतली. दि.११.०२.२०२२ रोजी रोहिदास कंठाळे व शिंदे सर्कल यांची बाचाबाची झाली होती. दि.११.०२.२०२२ रोजी मला कोणीही बोलवण्यास आले नव्हते. गट क्र.३५६ च्या पुर्वेस कोणाची जमीन आहे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी गावचा रहिवाशी असल्यामुळे मला गट क्र.३५६ या जमीनीची

माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी गट क्र.३५६ मध्ये कांद्याचे पीक केले होते. हे म्हणणे खरे आहे की, कांद्याचे पिकासाठी अनेक औषधे जसे की, रोगर, तण नाशके वगैरे औषधे शेतक–याकडे उपलब्ध असतात. हे म्हणणे खरे आहे की, शेतीच्या कामासाठी आर्टीकल 'अ' बॉटल आणली होती व ती शिंदे यांनी पोलीसांना दिली. हे म्हणणे खरे आहे की, मी पाहिले त्यावेळी आर्टीकल अ बॉटल शिंदे यांच्या हातात होती.

प्रश्न – आर्टीकल अ बॉटल त्यावेळी रिकामी व बिन झाकणाची होती?

उत्तर – त्यावेळी ती बाब मी पाहिली नाही.

०४. हे म्हणणे खरे आहे की, शिंदे सर्कल हे मुळ दहिगाव येथील रहिवाशी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, ते माझ्या ओळखची आहेत. हे म्हणणे खरे आहे की, ते आमच्या परीसरात राहतात त्यामुळे त्यांच्या अनेक ओळखीचे आहेत. हे मला माहित नाही की, त्यांच्याविरुध्द लोकांनी अनेक तक्रारी केल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यात काय लिहीले व कधी लिहीले हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी शिंदेच्या सांगण्यावरुन पंचनाम्यावर पोलीस स्टेशन मध्ये सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनाम्यास कधी हजर होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही

श्रवणोत्तर स्वीकृति

KULKARNI DATTATRAYA RAMESH Digitally signed by KULKARNI DATTATRAYA RAMESH Date: 2026.03.09 18:08:08 +0530

दिनांक- ०९.०३.२०२६

(डी.आर.कुलकर्णी)
प्रथमवर्ग न्यायदंडाधीकारी,
कोर्ट नं. ३ शेवगाव